**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्धीपत्रक

## अरबी समुद्रातील कमी दाबाच्या पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन सतर्क — आपत्ती व्यवस्थापनासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक

भारतीय हवामान विभागाच्या २२ मे २०२५ रोजी सकाळी ५.३० वाजता प्रसिद्ध केलेल्या विशेष हवामान बुलेटिननुसार, उत्तर कर्नाटका-गोवा किनारपट्टीच्या सान्निध्यात पूर्व-मध्य अरबी समुद्रात वरच्या स्तरातील चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीमुळे एक कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. सदर प्रणाली दक्षिण कोकण-गोवा किनारपट्टीलगत असून, ती पुढील ३६ तासांत उत्तरेकडे सरकत अधिक तीव्र होऊन वादळामध्ये परिवर्तित होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या हवामान बदलामुळे समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असून, किनारपट्टी भागांमध्ये जोरदार वारे, अवकाळी पाऊस आणि समुद्रात उंच लाटा निर्माण होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पावले उचलली असून, आज गुरुवार, दिनांक २२ मे २०२५ रोजी महापालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय आपत्ती व्यवस्थापन बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दीपक खांबित, विविध विभागप्रमुख, सहाय्यक आयुक्त, महापालिकेचे अधिकारी तसेच स्थानिक पोलीस प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत संभाव्य हवामान स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः किनारपट्टी भागात पुराचा धोका लक्षात घेता नागरिकांच्या संरक्षणाबाबत करावयाच्या उपाययोजनासाठी मार्गदर्शक सूचना केल्या. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, अन्न व पाणी पुरवठा आणि नागरिकांचे स्थलांतर यांसारख्या बाबींसाठी यंत्रणा तयार ठेवण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी दिले. सर्व प्रभाग कार्यालयांना आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि वाहने सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले. तसेच अग्निशमन दल, आरोग्य विभाग, आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांनी समन्वय साधून एकात्मिक प्रतिसाद यंत्रणा सक्रिय ठेवण्यावर भर देण्यात आला.

नियंत्रण कक्षाला २४x७ कार्यरत ठेवण्यात येत असून, कोणतीही आपत्कालीन माहिती, मदतीसाठी किंवा तक्रारीसाठी नागरिकांनी त्वरित संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे सज्ज असून, कोणतीही आपत्तीजन्य परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता फक्त अधिकृत स्रोतांवर विश्वास ठेवावा, हवामान विभागाच्या आणि महापालिकेच्या सूचनांचे पालन करावे व आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी यावेळी केले.